(34)

श्री. गुरु गणेश जैन शिक्षण समितीचे दक्षिण केसरी मुन्नी मिश्रीलालजी होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय औरंगाबाद. होमिओपॅथीक पदव्युत्तर (एम. डी.) अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देणेबाबत..

## महाराष्ट्र शासन

वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग

शासन निर्णय क्रमांक :- एचएमसी-१४००/९०/सीआर-१०१/२०००/शिक्षण-२,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२. दिनांक : ९ मार्च, २००१.

वाचा:- १ कुल सचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नासिक यांचे पत्र क्र. मआविवि/१०२/३७००/९९, दि. २९.१२.१९९९.

२ शासन पत्र वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,क्र. एचएमसी-१४००/९०/सीआर-१०१/२०००/शिक्षण-२,दि. १४ मार्च, २०००.

३ कुल सचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नासिक यांचे पत्र क्र. एमयुएचएस/१०२/८३२/२०००, दि. १७.५.१९९९.

४ केंद्रीय होमिओपॅथी परिषद नवी दिल्ली यांचे पत्र क्र.१९-८/२०००-सीसीएच/०८६७, दि. २२ डिसेंबर, २०००.

५ शासन पत्र वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग पत्र क्रमांक एचएमसी-१४००/९०/सीआर-१०१/२०००/शिक्षण-२,दि. ५ जानेवारी, २००१

६ केंद्रीय होमिओपॅथी परिषद नवी दिल्ली यांचे पत्र क्र.१९-४/२०००-सीसीएच/११५४, दि.१६.१. २००१.

<u>प्रस्तावना :-</u> श्री. गुरु गणेश जैन शिक्षण समितीचे दक्षिण केसरी मुन्नी मिश्रीलालजी होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय औरंगाबाद या संस्थेने त्यांच्या संस्थेस होमिओपॅथी पदव्युत्तर (एम.डी.) अभ्यासक्रम सुरु करण्याबाबतचा प्रस्ताव महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ मार्फत शासनास सादर केला. संस्थेच्या प्रस्तावावर शासनाने विचार करुन सदर संस्थेस होमिओपॅथी पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यासंबधी वरील संदर्भ क्रमांक (२) अन्वये शासनाचे नाहरकत प्रमाणपत्र केंद्रीय होमिओपॅथी परिषद, नवी दिल्ली यांना पाठविण्यात आले. केंद्रीय होमिओपॅथी परिषद, नवी दिल्ली यांनी उपरोक्त संदर्भ क्र.(३) व (६) अन्वये सदर संस्थेस होमिओपॅथीक फिलॉसॉफी, मटेरिया मेडीका आणि रेपरेटरी या तीन विषयात प्रत्येकी ६ विद्यार्थी प्रवेश क्षमतेचे होमिओपॅथी पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता दिली आहे. केंद्रिय होमिओपॅथी परीषद नवी

दिल्ली यांनी मान्यता दिल्यानुसार सदर संस्थेस होमिओपॅथी पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती.

**शासन निर्णय :-** केंद्रिय होमिआओपॅथी परीषद, नवी दिल्ली यांनी मान्यता दिल्यानुसार श्री. गुरु गणेश जैन शिक्षण समितीचे दक्षिण केसरी मुनी मिश्रीलालजी होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय औरंगाबाद या संस्थेत वर नमुद केलेल्या विषयात सन २०००-२००१ या शैक्षणिक वर्षात होमिओपॅथी पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास व प्रत्येक विषयात ६ विद्यार्थी प्रवेश खालील अटी व शर्तींच्या अधिन राहून मान्यता देण्यात येत आहे.

१ संस्थेने या अभ्यासक्रमाचे प्रसतावास महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नाशिक यांची सलग्नता मिळवावी.

२ संस्थेने त्यांच्या संस्थेत केंद्रिय होमिओपॅथी परिषद नवी दिल्ली यांच्या मानकानुसार आवश्यक त्या शैक्षणिक सुविधांची पुर्तता करावी.

३ या अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी शासन किंवा महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ नासिक मान्य करेल त्या नियमानुसार प्रवेशकरावे लागतील.

४ राज्य शासनाने होमिओपॅथीक महाविद्यालयाबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे संस्थेवर बंधनकारक राहील.

५ महाराष्ट्र एज्युकेशन इन्स्टिटयुशनस् (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) अॅक्ट, १९८७ (महाराष्ट्र अॅक्ट ६ ऑफ १९९८) मधील तरतुदींचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

६ सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यातआली आहे त्यामुळे संस्था आवर्ती/अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही असे लेखी अभिवचन संस्थेने दिले पाहिजे.

७ या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क बी.एच.एम.एस.अभ्यासक्रमाच्या मुक्त व मुल्यभारीत जागांकरीता असलेल्या शुल्का प्रमाणे आकारण्यात यावे.

२. शासन निर्णय, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग क्रमांकः एमईडी-१३९८/सीआर- १८०/९८/ शिक्षण-१, दिनांक १०.११.१९९८, अनुसार या अभ्यासक्रमाच्या प्रस्तावाची छाननी करण्यासाठी प्रत्येक विषयास रु. २५,०००/- या प्रमाणे ३ विषयासाठी रु.७५,०००/- (रुपये पंच्याहत्तर हजार फक्त) (नापरतावा) भारतीय रिझर्व बँक/ जिल्हा कोषागारात चलनाद्वारे भरावे व त्याची प्रत शासनास सादर करावे. सदरचे शुल्क खालील लेखाशिर्षाखाली भरण्यात यावी.

**लेखाशिर्ष**

०२१० - वैद्यकीय सेवा व सार्वजनिक आरोग्य

०३ - वैद्यकीय शिक्षण, प्रशिक्षण व संशोधन

(36)

१०५ - विषमचिकित्सा
(३) - इतर जमा.

३. सक्षम प्राधिकारी, तथा कुल सचिव, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक यांनी सदर संस्थेमध्ये नियमानुसार प्रवेश करावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने.

(भा.र.गावित)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रति,
मा.राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई.
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई.
मा.उपमुख्यमंत्र्यांचे सचिव मंत्रालय, मुंबई.
कुलगुरु, महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठ, नाशिक. (५ प्रती)
सचिव, केंद्रीय हामिओपॅथी परिषद, नवी दिल्ली (पत्राने)
संचालक, आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई. (५ प्रती)
सहायक संचालक, आयुर्वेद, मुंबई/पुणे/नागपूर.
प्राचार्य, श्री. गुरु गणेश जैन शिक्षण समितीचे दक्षिण केसरी मुनी मिश्रीलालजी होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालय आणि रुग्णालय औरंगाबाद
सर्व प्राचार्य, होमिओपॅथीक वैद्यकीय महाविद्यालये
मा. मंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव.
मा.राज्यमंत्री (वै.शि.) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई
सर्व उप सचिव/अवर सचिव/कक्ष अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई.
निवडनस्ती (शिक्षण-२)

PRINCIPAL
D.K.M.M. HOMOEOPATHIC
MEDICAL COLLEGE
AURANGABAD - 431 004

(37) (115)

दक्षिण केशरी मुन्नी मिश्रीलालजी होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद येथे पदव्युत्तर (एम.डी) अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**
शासन निर्णय क्रमांक :एचएमसी-१५०२/३७६/सीआर-१२७/शिक्षण-२,
वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग,
मंत्रालय, मुंबई
दिनांक : १५ जून, २००२

वाचा :
१) शासन निर्णय वैद्यकीय शिक्षण औषधी द्रव्ये क्रमांक : एचएमसी-१४००/९०/सीआर-१०१/२०००/शिक्षण-२,दिनांक ९ मार्च,२००१
२) डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे पत्र क्र.एसीएडी/एएफएफआयएल/०२/व्ही/२१६९२-९६, दिनांक १६.१.२००२
३) केंद्रिय होमिओपॅथिक परीषदेचे पत्र क्रमांक : १९-४/२०००/सीसीएच/४४६७३, दिनांक २२ मार्च, २००२

<u>शासन निर्णय</u> :- श्री. गुरु गणेश जैन शिक्षण समितीचे दक्षिण केशरी मुन्नी मिश्रीलालजी होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, औरंगाबाद या संस्थेस होमिओपॅथी फिलॉसॉफी, मटेरिया मेडिका व रेपरेटरी या तीन विषयात नियमित होमिओपॅथी पदव्युत्तर (एम.डी.) अभ्यासक्रम सुरु करण्यास शासनाने संदर्भांकित क्रमांक (१) येथील शासन निर्णयाद्वारे मान्यता दिलेली आहे. त्याच विषयांमध्ये सदर महाविद्यालयात विषयांच्या नावासमोर दर्शविलेल्या प्रवेश क्षमतेसह होमिओपॅथिक बहिस्थ पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास केंद्रिय होमिओपॅथी परीषदेने दिनांक २२ मार्च, २००२ च्या पत्राद्वारे दिलेली मान्यता विचारात घेऊन शासन आता २००१-०२ पासून बहिस्थ पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास मान्यता देत आहे.

| अ.क्र. | विषय | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १) | होमिओपॅथी फिलॉसॉफी | ९ |
| २) | मटेरिया मेडीका | ९ |
| ३) | रेपरेटरी | ९ |

तसेच, संदर्भांकित क्रमांक (३) येथील पत्राद्वारे केंद्रिय होमिओपॅथी परिषदेने ज्या दोन विषयात नव्याने नियमित पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास परवानगी दिली आहे, त्या विषयात सन २००१-०२ या वर्षापासून नियमित पदव्युत्तर अभ्यासक्रम सुरु करण्यास शासन मान्यता देत आहे.

| अ.क्र. | विषय | प्रवेश क्षमता |
|---|---|---|
| १) | प्रॅक्टीस ऑफ मेडिसीन | १ |
| २) | पेडियाट्रिक्स | ६ |

38

सदरची मान्यता ही खालील अटींच्या अधीन राहून देण्यात येत आहे.

(१) महाविद्यालयाने वरील उल्लेखित पदव्युत्तर अभ्यासक्रमांना डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांची संलग्नता मिळवावी.

(२) सदरच्या पदव्युत्तर अभ्यासक्रमाच्या प्रवेशासाठी शासन / संबंधित विद्यापीठ मान्य करील त्याप्रमाणे प्रवेश नियम करावे लागतील.

(३) राज्य शासन/ विद्यापीठ / होमिओपॅथी परिषदेने होमिओपॅथिक महाविद्यालयांबाबत वेळोवेळी विहित केलेल्या नियमांचे व मानकांचे पालन करणे, संस्थेवर बंधनकारक राहील.

(४) महाराष्ट्र एज्युकेशनल इन्स्टिट्यूशन्स (प्रोहिबिशन ऑफ कॅपिटेशन फी) ॲक्ट, १९८७ (महाराष्ट्र ॲक्ट ६ ऑफ १९८८) मधील तरतुदीचे संस्थेने काटेकोरपणे पालन करणे आवश्यक आहे.

(५) सदरहू संस्थेस कायम विना अनुदान तत्वावर मान्यता देण्यात आली आहे. त्यामुळे संस्था आवर्ती/ अनावर्ती स्वरुपाच्या खर्चासाठी शासनाकडे अनुदानाची मागणी करणार नाही, असे लेखी अभिवचन संस्थेने दिले पाहिजे.

(६) या अभ्यासक्रमाचे शैक्षणिक शुल्क बी.एच.एम.एच. अभ्यासक्रमाच्या मुक्त व मुल्यभारीत जागांकरिता असलेल्या शुल्काप्रमाणे आकारण्यात यावे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(दत्तात्रय बोन्हाडे)

कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रति,

मा. राज्यपालांचे सचिव, राजभवन, मुंबई

मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव, मंत्रालय, मुंबई

मा. उपमुख्यमंत्र्यांचे सचिव, मंत्रालय, मुंबई

प्रधान सचिव, उच्च व तंत्र शिक्षण विभाग, मंत्रालय, मुंबई

सचिव, केंद्रिय होमिओपॅथी परिषद, नवी दिल्ली (पत्राने)

कुलसचिव, महाराष्ट्र आरोग्यविज्ञान विद्यापीठ, नाशिक (५ प्रती)

संचालक, आयुर्वेद संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई

सहायक संचालक, आयुर्वेद, मुंबई/पुणे/नागपूर

प्राचार्य, श्री. गुरु गणेश जैन शिक्षण समितीचे दक्षिण केसरी मुन्नी मिश्रीलालजी होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालय

सर्व प्राचार्य, होमिओपॅथिक वैद्यकीय महाविद्यालये

मंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

मा. राज्यमंत्री (वै.शि.) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई

सर्व कार्यासन अधिकारी, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, मंत्रालय, मुंबई

निवड नस्ती (शिक्षण-२)

PRINCIPAL
D.K.M.M. HOMOEOPATHIC
MEDICAL COLLEGE
AURANGABAD - 431 004